**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०८**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २७/०७/२०१०

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.०८शनिवार दि. ३१/०७/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**शनिवार दिनांक- ३१/०७/२०१० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ५२ | अहमदनगर महानगरपालिकेचे शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री.मगर एन.बी. यांनी कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरले असल्याने मा.शासन निर्णयानुसार दिनांक २२/१/२००९ते ऑक्टोंबर २००९अखेर कालावधीचा वाहनभत्ता त्यांना अदा करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट (मा.स्था.स. ठराव क्र. ४४ दि.२०/७/२०१० नुसार पुढील सभेमध्ये निर्णयार्थ घेणेचा प्रस्ताव) |
| ५३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या मालावर जकात वसुली कामी सन २०१०-२०११ या आर्थिक बारा महिन्याकरिता जकात अभिकर्ता नेमणे कामी दुस-यांदा जाहिर निविदा प्रसिध्द करूनही एकही निविदा प्राप्त झालेली नसल्याने योग्य तो धोरणात्मक निर्णय ठरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय-क्रमांक- ५३ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०८**

विषय क्रमांक- ५२ शनिवार दिनांक ३१/७/२०१०

ठराव क्रमांक- ५२ शनिवार दिनांक ३१/७/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. मगर एन.बी. यांनी कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरले असल्याने मा. शासन निर्णयानुसार दिनांक २२/१/२००९ ते ऑक्टोंबर २००९ अखेर कालावधीचा वाहन भत्ता त्यांना अदा करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट (मा.स्था.स. ठराव क्र. ४४ दि.२०/७/२०१० नुसार पुढील सभेमध्ये निर्णयार्थ घेणेचा प्रस्ताव)

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा मोटार व्हेईकल विभाग दि.

विषय :-अहमनगर महानगरपालिकेचे शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले अभियंता श्री.एन.बी. मगर यांना कार्यालयीन कामकाजाकरिता वाहन वापराचा प्रतिपूर्ती भत्ता मिळणे बाबत.

संदर्भ :- १) श्री. एन.बी. मगर शहर अभियंता यांचा दि. ६/११/०९ चा अर्ज

२) सा.प्र.वि. जा.क्र. ४८९९ दि.२२/१/०९ अन्वयेचा कार्या.आदेश

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५ दि.२२/१/०८

४) शासन निर्णय क्र. वाहन १००७ /प्र.क्र. ४८ /२००७ विनियम ३१ डिसें. २००७

मा.सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर की, महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री.व्ही.डी.पालवे यांची बदली झाल्यानंतर संदर्भ क्र.२ नुसार श्री.एन.बी. मगर यांनी शहर अभियंता या पदाचा कार्यभार दि.२२/१/२००९ पासून स्विकारला आहे. त्यांनी यापूर्वीही महानगरपालिकेच्या नवीन स्थापनेनंतर दि.३०/६/०३ ते २४/८/०४ व १७/१/०६ ते ६/८/०७ व २७/१०/०६ ते ६/८/०७ अखेर असा तीन वेळेस शहर अभियंता या पदाचा कार्यभार सांभाळलेला आहे. त्यांनी या कालावधीत मोटार व्हेईकल विभागाकडून वेळोवेळी भाडेतत्वावरील वाहन कार्यायलीन कामकाजाकरिता वापरले होते.

उपरोक्त संदर्भ क्र.२ चे कार्यालयीन आदेशान्वये कार्यकारी अभियंता(प्र.)श्री.एन.बी. मगर यांनी दि.२२/१/०९ पासून शहर अभियंता या पदाचा कार्यभार स्विकारला असून ते सध्या याच पदावर कार्यरत आहेत. त्यांनी २२/१/२००९ पासून कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन क्र. एम.एच. १६ ए.बी.३५१(स्वीफ्ट मारूती) या वाहनाचा वापर केलेला असून ते सध्याही स्वतःचे वाहन कार्यालयीन कामकाजासाठी वापरत आहेत. शहर अभियंता या पदाचा कार्यभार व कर्तव्ये पाहता त्यांना आपतकालीन व्यवस्थापन,रास्ता रोको व आंदोलने तसेच शासकीय कार्यालयाकडील कार्यालयीन बैठका यासाठी समक्ष उपस्थित राहणेसाठी भाडेतत्वावरील वाहन वेळेत उपलब्ध राहणेसाठी भाडेतत्वावरील वाहन वेळेत उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होत असल्याने त्यांनी स्वतःचे वाहन वापरणे योग्य असल्याबाबत संदर्भ क्र.१ च्या पत्रात नमूद केलेले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.३ नुसार मा. शासन निर्णय क्र.वाहन १००५/ प्र.क्र.१३ /२००५ / विनियम मंत्रालय, मुंबई ३२ दि.२५ मे २००५ चा आधार घेवुन मा. समिती ठराव क्र. २५ दि.२२/१/०८ अन्वये महानगरपालिकेचे अधिकारी व पदाधिकारी यांना डिझेल वाहनास १६०००/- व पेट्रोल वाहनास रू.१८०००/- याप्रमाणे ठराव पारित झालेला असून त्यानुसार मा. अधिका-यांपैकी मा.उपायुक्त (सा.) व मा.मुख्य लेखाधिकारी यांना दरमहा वाहन प्रतिपूर्ती भत्ता अदा करण्यात येत आहे.

परंतु शासन निर्णय क्र.१००५/प्र.क्र. १३ /२००५/विनिमय दि.२५ मे २००५ हा पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने संदर्भ क्र.४ चे शासन निर्णयानुसार शासन निर्णय झाल्याचे दिनांकापासून अगोदर पदावर कार्यरत असलेल्या अधिका-यांना लागू ठेवून रद्द करण्यात आलेला आहे.

संदर्भ क्र.१ च्या शहर अभियंता, श्री.एन.बी. मगर यांच्या मागणीनुसार त्यांना कार्यालयीन कामकाजाकरीता वापरलेल्या स्वतःचे वाहनाचा प्रतिपूर्ती भत्ता संदर्भ क्र.३ नुसार द्यावयाचा झाल्यास २२/१/२००९ ते ऑक्टोबर २००९ अखेर प्रतिमहा रू.१८०००/- प्रमाणे एकूण रू.१,६७,८००/- इतका दयावा लागेल. तसेच मंजूर वाहनभाडे दराने दिल्यास कार्यालयीन सुट्टया सोडून प्रतिदिनी रू.४९०/- [इंधना व्यतिरिक्त ] + प्रतिदिनी वाहनाचा सरासरी वापर ३० कि.मी. व वाहनचे ॲव्हरेज १५ कि.मी. लिटर धरल्यास प्रतिदिनी २ लिटर इंधनाचा खर्च प्रतिलिटर सरासरी ४०/- रू. प्रमाणे प्रतिदिनी ८० रू. असा एकूण प्रतिदिनी ५७०/- रू. प्रमाणे आजपर्यत ७ महिने व १६ दिवसांचे १,५९,६००/- रू. अदा करावे लागतील.

तरी वरील बाब हि धोरणात्मक व आर्थिक असल्याने तसेच भत्ता निश्चितीची असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २० चे कलम ३४६ नुसार याबाबत परिवहन समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. परंतु परिवहन समिती अस्तित्वात नसल्याने कलम ६७ चे खंड ३ [ब ] व खंड ४ [ब] नुसार त्यांचा कार्यालयीन कामकाजाचा वाहन भत्ता निश्चिती करून त्यांना या पदावर कार्यरत असे पर्यत कार्यालयीन कामकाजाचा प्रतिपूर्ती भत्ता मिळणेस तसेच त्यांचा कार्यालयीन कामकाजासाठी २२/१/२००९ पासून ऑक्टोबर २००९ पर्यत वाहन भत्ता एकूण रू.१,५९,६००/- त्यांना अदा करणेस मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे उचित वाटते. तथापी आपले पुढील योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईल विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि.२७/११/०९

मा. शहर अभियंता :- अहवालानुसार मी स्वतः महानगरपालिकेच्या विविध कामासाठी दि.२२/१/०९ पासून (शहर अभियंता पदाचा कार्यभार घेतल्यापासून) माझे स्वतःचे वाहन MH १६ AB ३५१ वापरले आहे. मला आपत्कालीन व्यवस्थापन, रास्ता रोको, आंदोलन , वेगवेगळया शासकीय बैठका, मनपाचे विविध कामे पहाणी या कामासाठी महानगरपालिकेचे भाडेतत्वावरील वाहन वेळेवर उपलब्ध होत नाही. त्यामुळे मी स्वतःचे वाहन वापरले आहे. तरी मला अहवालानुसार वाहन भत्ताची रक्कम मिळावी ही विनंती. दि.२७/११/०९

मुख्य लेखा परिक्षक :- <u>शहर अभियंता यांना स्वतःचे वाहन वापरणे बाबत मंजूरी आहे.</u> दि. २२/१/०९ ते ऑक्टो.०९ अखेर स्वतःचे खाजगी वाहन वापरल्याचे दिसून येते. स्वतःचे खाजगी वाहन वापरण्यास खर्च रू.१,६७,८००/- इतका येतो. परंतु भाडयाने वाहन वापरलेस खर्च रू. १,५९,६००/- इतका येईल शहर अभियंता यांनी कमी रकमेची म्हणजे रू.१,५९,६००/- ची मागणी केलेली आहे. त्यांचे कामाचे स्वरूप विचारात घेवुन श.अ. यांना रू. १,५९,६००/- मंजूर करणेबाबत मा.स्थायी समिती पुढे मान्यतेसाठी सादर करणे योग्य दि. ३/१२/०९/ **<u>अ</u>**

मुख्य लेखा अधिकारी :- शहर अभियंता पदांसाठी वाहन अनुज्ञेय आहे. महापालिकेने त्यांना खाजगी वाहन उपलब्ध करून न दिल्याने श्री. मगर यांनी त्यांचे स्वतःचे खाजगी वाहन मनपा कामासाठी वापरले असल्याचे दिसुन येते. त्यांनी २२ जानेवारी ०९ पासून वाहन भत्ता व तदनुषंगिक खर्चाची मागणी केली आहे. सदर बाब मा. स्थायी समितीचे अधिकार क्षेत्रात असल्याने त्यांचे मान्यतेसाठी तथा निर्णयास्तव प्रस्ताव सादर करणे योग्य राहील. दि.३/१२/०९

मा.उपायुक्त (कर) साहेब :- प्रस्तावीतबाबत शहर अभियंता यांना वाहन अनुज्ञेय आहे. **"अ"** नुसार शहर अभियंता व इतर अनुज्ञेय अधिकारी यांना स्वत:चे वाहन वापरणेबाबत मा. शासन निर्णय क्र. वाहन १००५/प्र.क्र..१३/२००५ /विनिमय मंत्रायल, मुंबई-३२ दि.२५ मे २००५ नुसार वाहन वापराबाबत प्रतीपूर्ती देणे बाबतचा धोरणात्मक स्वरूपाचा निर्णय मु.प्रां.म.न.पा. अधिनियम १९४९ कलम ६७(३) नुसार मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ सादर करणे योग्य.

तथापी यापूर्वीच्या कालावधीतील वाहनवापराबाबतची प्रतीपूर्ती देणेयोग्य राहणार नाही अशी धारणा आहे.सबब मा.स्थायीसमितीसमोर निर्णयार्थ सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर /**अ**

मा.आयुक्त साहेब :- **"अ"**मान्य स्थायी समिती समोर ठेवा. दि.१५/०१/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. मगर एन.बी. यांनी कार्यालयीन कामकाजासाठी स्वत:चे वाहन वापरले असल्याने त्यांना वाहनभत्ता अदा करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- मा.सभापती,महोदय आजचे सभेचे अजेंडयावरील विषय क्र.५२ श्री. मगर एन.बी. यांना वाहन भत्ता मंजुरी बाबत प्रस्ताव आहे. श्री.मगर यांचे दैनंदिनी कोणत्या अधिका-याकडे सादर केलेले आहेत. यासह पत्रामधील इतर मुद्दयांचा खुलासा व्हावा तो पर्यत सदरचा विषय तहकुब ठेवावा असे पत्र मी आपणाकडेस आज दिलेले आहे त्यांचा खुलासा व्हावा.

मा.सभापती साहेब :- सदर विषयाबाबत आपण सादर केलेले पत्र हे महानगरपालिकेचे बांधकाम विभागाकडेस पाठविण्यांत येत आहे. त्यांचे कडून आपणांस आवश्यक ती माहिती मिळेल प्रशासनाने शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. मगर एन.बी. यांना वाहन वापराचा प्रतीपूर्ती भत्ता अदा करणेस मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव मागील सभेमध्ये निर्णयासाठी घेणेत आला होता. त्यावेळी प्रस्तावाची टिप्पणी अजेंडया सोबत सर्वांना पाठविण्यांत आलेली होती. सदर प्रस्ताव प्रशासनाने नियमानुसार मंजूरीसाठी सादर केलेला आहे. श्री. मगर यांचेकडेस शहर अभियंता पदाचा कार्यभार असेल तो पर्यत त्यांना वाहन वापराची प्रतीपूर्ती देणेत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- श्री. मगर एन.बी. शहर अभियंता यांनी दिनांक २२/०१/२००९ ते आज अखेर पर्यंतचे कालावधी मध्ये स्वत:चे वाहन कार्यालयीन कामकाजासाठी वापरले असल्याने त्यांना दिनांक २२/०१/२००९ ते आज अखेर पर्यतचे कालावधीचा वाहन वापराचा प्रतीपूर्ती भत्ता अदा करणेस मंजूरी देण्यांत यावी. तसेच त्यांचे कडेस शहर अभियंता पदाचा कार्यभार असेल तो पर्यत त्यांनी स्वत:चे वाहन वापरलेस त्यांना वाहन वापराची प्रतीपूर्ती देणेत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- त्याप्रमाणे मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- शहर अभियंता पदावर कार्यरत असलेले श्री. मगर एन.बी. यांनी कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरले असल्याने त्यांना दिनांक २२/१/२००९ ते आज अखेर पर्यतचे कालावधीचा वाहन वापराचा प्रतीपूर्ती भत्ता अदा करणेस मंजूरी देण्यांत यावी. तसेच श्री. मगर एन.बी. यांचेकडेस शहर अभियंता पदाचा कार्यभार असेल तो पर्यत त्यांनी स्वतःचे वाहन कार्यालयीन कामकाजासाठी वापरलेस त्यांना वाहन वापराची प्रतीपूर्ती देणेत यावी ठराव बहुमताने मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. मगर एन.बी. यांनी कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरले असल्याने त्यांना दिनांक २२/०१/२००९ ते आज अखेर पर्यतचे कालावधीचा वाहन वापराचा प्रतीपूर्ती भत्ता अदा करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर, तसेच श्री.मगर एन.बी. यांचेकडेस शहर अभियंता पदाचा कार्यभार असेल तो पर्यत त्यांनी कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरलेस त्यांना वाहन वापरचा प्रतीपूर्ती भत्ता देणेत यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०८**

विषय क्रमांक- ५३ शनिवार दिनांक ३१/७/२०१०

ठराव क्रमांक- ५३ शनिवार दिनांक ३१/७/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या मालावर जकात वसुली कामी सन २०१०-२०११ या आर्थिक बारा महिन्याकरिता जकात अभिकर्ता नेमणे कामी दुस-यांदा जाहिर निविदा प्रसिध्द करूनही एकही निविदा प्राप्त झालेली नसल्याने योग्य तो धोरणात्मक निर्णय ठरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका जकात विभाग दि.२०/७/२०१०

सविनय सादर,

अहमदनगर महानगरपालिकेने सन२०१०-११ करीता जकात वसुलीसाठी जकात अभिकर्ता नेमण्यास मा.स्थायी समिती ठराव क्र.२७ दि.२३/६/२०१०अन्वये देकार रक्कम रु.५८,०५,०९,४९४ /- निश्चीत करुन वर्तमान पत्रांतुन दोन वेळेस जाहिर निविदा सुचना प्रसिध्द केलेल्या आहेत,

सदर जाहीर सुचनेत प्रसिध्द केल्याप्रमाणे दिनांक २५/६/२०१० च्या पहिल्या निविदा सुचनेनुसार १) सहकार ग्लोबल प्रा.लि.मुंबई व २) एम.इ.पी. टोल रोड प्रा.लि. मुंबई यांचेमार्फत निविदा फार्म घेण्यात आले होते व त्यांनी नियमानुसार आवश्यक ती प्रत्येकी इसारा रक्कम रु. २,९०,२५,४७५ /- महानगरपालिकेच्या कोषात भरलेली आहे , मात्र निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख ७/७/२०१० असताना सदर दिवशी एकही निविदा प्राप्त झालेली नाही ,

मे. एम.ई.पी. टोल रोड प्रा.लि. यांनी महानगरपालिकेने दिलेल्या पहिल्या जाहीर निविदा सुचनेनुसार सा.पा.नं. १२१८३२ दि.५/७/२०१० अन्वये इसारा रक्कम रु.२,९०,२५,४७५/- भरलेली आहे, मात्र त्यांनी दि.६ /७/२०१०रोजी सदर इसारा रक्कमेचा परतावा मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे.

पहिल्या जाहिर निविदा सुचनेनुसार एकही निविदा प्राप्त न झाल्याने महानगरपालिकेने दि. ८/७/२०१० रोजी दुस-यांदा फेर निविदा प्रसिध्दीस दिलेली आहे , सदर निविदा सुचनेनुसार जकात अभिकर्ता नेमणुक प्रकरणी दि. १७/७/२०१०अखेर १) एस.एम.एस.इन्फ्रास्ट्रक्चर ,नागपुर .२) सहकार ग्लोबल प्रा.लि. मुंबई. अशी दोन निविदा फार्म ची विक्री झालेली आहे. व सदर निविदाकारांनी विहीत मुदतीत नियमानुसार प्रत्येकी आवश्यक ती इसारा रक्कम रु.२,९०,२५,४७५/- महानगरपालिकेकडे भरणा केलेली आहे, मात्र निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख १९ /७/२०१० असताना सदर दिवशी देखील एकही निविदा प्राप्त झालेली नाही ,

सन २०१०-११ या वर्षाकरीता जकातीस्तव अभिकर्ता नेमणुकीच्या उक्त प्रक्रियेबाबत मा. शेख आरिफ रफियोद्दीन सभागृह नेते अहमदनगर महानगरपालिका.यांनी दि. ३०/६/२०१० रोजी जकात विभागाकडेस खालील प्रमाणे यादी दिलेली आहे,

"महानगरपालिकेने गेली ३ ते ४ वर्षापासुन जकात वसुली ही जकात अभिकर्त्या मार्फत केलेली आहे, महानगरपालिकेने जकात अभिकर्ता नेमताना सदर जकात अभिकर्ता हा महानगरपालिकेने अभिकर्ता नेमण्यासाठी ठरविलेल्या अटी व शर्ती प्रमाणे पात्र आहे किंवा नाही याची ही खात्री करुन घेणे आवश्यक असते , महानगरपालिकेने यापुर्वी जकात अभिकर्ता नेमण्याकरीता ज्या किमान पात्रता ठरविलेल्या होत्या त्यातील महत्वाची किमान पात्रता म्हणजे सदर जकात अभिकर्त्यास किमान देकार रक्कमे इतकी आर्थिक उलाढाल करण्याची क्षमता तसेच एक वर्षाचा जकात वसुलीचा अनुभव असणे ही महत्वाची अट त्यात नमुद केलेली होती,

जकात अभिकर्त्याची नेमणुक करताना तो जकात अभिकर्ता म्हणुन काम करीत असताना त्याचा त्याच क्षेत्रातील अनुभव असणे आवश्यक आहे, आपण दि. २४/६/२०१०रोजी सन २०१०-११ या सालाकरीता जी जाहीर निविदा मागविलेली आहे त्यात निविदा धारकास एक वर्षाचा अनुभव व एक वर्षात किमान ४०कोटी रक्कमेचा जकात / पथकर (टोल) वसुलीचा अनुभव असावा असे नमुद केलेले आहे, आपण आपल्या जाहीर निविदेत सदर नमुद केलेली अट तसेच पथकर (टोल) वसुलीच्या अनुभवाबाबत गृहीत धरलेली पात्रता ही संपुर्णपणे बेकायदेशीर असुन केवळ पथकर वसुलीचा अनुभव ही जकात अभिकर्त्याची किमान पात्रता राहु शकत नाही. त्यामुळे आपण त्याबाबत काढलेली जाहीर निविदा ही पुर्णपणे बेकायदेशीर असुन जी मार्गदर्शक तत्वे ठरविलेली आहेत त्याच्या विरहीत अशी आहेत .

सदर बाबत मा. उच्च न्यायालय ,मुंबई येथे रिट पिटीशन नं. २५८४ / २००८ व १३५/२००९ या रिट पिटीशन मध्ये त्यावेळचे मुख्य न्यायमुर्ती मा. स्वतंत्र कुमार व न्यायमुर्ती मा.डॉ.डी.वाय. चंद्रचुड यांनी त्यांच्या पुढील वरील रिट पिटीशन मध्ये पथकर वसुली व जकात वसुली याबाबत स्पष्ट आदेश दिलेले आहेत , त्याच प्रमाणे जकात अभिकर्ता म्हणुन जकात वसुलीचे काम करणे हे विशेष प्रकारचे काम असुन त्याकामासाठी टोल वसुलीचा अनुभव हा जकात वसुलीचा अनुभव आहे असे समजण्यात येणार नाही असे स्पष्ट आदेश सदर निर्णयाच्या पेरा नं. १६ मध्ये दिलेले आहे.

वरील प्रमणे न्यायालयाच्या निर्णयाचा विचार करता आपण आपल्या जाहीर निविदा सुचनेत किमान पात्रता नमुद करताना पथकर (टोल) वसुलीचा एक वर्षाचा अनुभव गृहीत धरला जाईल असे जे नमुद केलेले आहे ते चुकीचे आहे.पथकर वसुलीसाठी कोणत्याही विशेष ज्ञानाची आवश्यकता नसते कारण पथकर हा वेगवेगळ्या गाड्यानुसार ठरलेल्या दरानुसार आकारावा लागतो परंतु जकात अभिकर्ता म्हणुन काम करताना वेगवेगळ्या प्रकारचा माल येत असतो त्या मालाची किंमत, प्रतवारी यासाठी विशेष ज्ञानाची आवश्यकता असते व अशा ठिकाणी पथकर वसुलीचा अनुभव उपयोगी नसतो याबाबत इतर महानगरपालिके कडुन घेतलेल्या माहीती वरुन असे समजते की, त्यांनी देखील जकात अभिकर्ता नेमणे कामी निविदा काढताना पथकर (टोल) वसुलीचा अनुभव असावा असे गृहीत धरलेले नाही याकरीता आपण जाहीर निविदेबाबत शुध्दीपत्रक काढुन दुरुस्ती करावी , पथकर (टोल) वसुलीचा अनुभव असावा ही दिलेली अट वगळण्यात यावी व जकात अभिकर्ता यास किमान ४० कोटी रक्कमेच्या जकात वसुलीचा कमीत कमी एक वर्षाचा अनुभव असावा अशी अट टाकणे आवश्यक आहे असे वाटते."अशा बाबत यादी दिलेली आहे.

सदर यादीनुसार मा.शेख आरिफ रफियोद्दीन,सभागृह नेते यांना इकडील जकात/जा.क्र.८१ दि.२/७/२०१० अन्वये-सन २०१०-११ करीता जकात वसुली करीता जकात अभिकर्ता नेमणुक करण्याबाबत मा. स्थायी समिती ठराव क्र.२७ दि.२३/६/२०१० अन्वये अट क्र. १) जकात अभिकर्ता नेमणूकीसाठी निविदा धारकास पुर्वीचा किमान एक वर्षाचा अनुभव व एक वर्षात किमान ४० कोटी रकमेचा जकात / पथकर (टोल) वसुलीचा अनुभव असावा. याबाबत अटी शर्ती ठरविण्यात आल्या असल्याने उक्त अटी व शर्ती यामध्ये फेरबदल प्रशासकीय स्तरावर करता येणार नाही अशाबाबत पत्राने कळविण्यात आलेले आहे,

तसेच मा. शेख आरिफ रफियोद्दीन सभागृह नेते यांनी दिलेल्या उक्त यादी प्रमाणे मा.संजयजी गाडे , स्थायी समिती सभापती ,अहमदनगर महानगरपालिका यांनी दि.१९ /७ /२०१० रोजी इकडेस खालीलप्रमाणे यादी दिलेली आहे .

"अहमदनगर महानगरपालिकेतील प्रमुख उत्पन्नाचे साधन असणा-या जकात वसुली बाबत अहमदनगर महानगरपालिकेने जकात अभिकर्ता नियुक्तीबाबत दि. २५-६-२०१० रोजी व ८-७-२०१० रोजी मा. स्थायी समिती ठराव क्र. २७ दिनांक २३-६-२०१० अन्वये दोन वेळा जाहीर निविदा प्रसिध्द करुन अद्याप देखील महानगरपालिकेस एकही निविदा प्राप्त झालेली नाही. महानगरपालिका सन २००९-२०१० च्या अभिकर्त्याची मुदत ३१ जुलै २०१० रोजी समाप्त होणार आहे. तरी याबाबत तात्काळ निर्णय होणे अपेक्षित आहे. सभागृह नेता यांचे दिनांक ३०/६/२०१० रोजीच्या पत्रावर आपण दिलेल्या दिनांक २/७/२०१० च्या पत्राचे अनुषंगाने न्यायालयीन अडचण निर्माण होऊ शकते , तरी जकातीची तिसरी निविदा प्रसिध्द न करता सदरचा विषय तात्काळ मा. स्थायी समिती समोर सादर करण्यांत यावा. महानगरपालिकेचे प्रमुख उत्पन्नाचे साधन असणा-या जकात वसुली बाबत करावयाच्या उपाय योजने विषयी निर्णय घेणे सुलभ होईल.तरी सदरचा विषय प्राधान्याने काल मर्यादेत मा. स्थायी समिती समोर सादर करण्याची दक्षता घ्यावी."

अहमदनगर महानगरपालिकेने सन २००९-१०या वर्षाकरीता मे.सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड यांची जकात अभिकर्ता म्हणुन नेमणुक केलेली आहे, सदर जकात अभिकर्त्याची जकात वसुलीची कराराची मुदत दि.३१/७/२०१० रोजी संपते आहे,सन २०१०-११ या वर्षाकरीता जकात अभिकर्ता नेमणुक करणे कामी वरील प्रमाणे दोन वेळेस वर्तमान पत्रांतुन जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन देखील एकही निविदा प्राप्त झालेली नसुन तिसरी जाहीर निविदा प्रसिध्द करण्यास नियमानुसार आवश्यक तो पुरेसा कालावधी शिल्लक राहीलेला नाही, मुदतीत जकात अभिकर्ताची नेमणुक न झाल्यास जकात अभिकर्त्याची नेमणुक होई पर्यंत उक्त कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या कर्मचा-यांमार्फत जकात वसुल करणे भाग पडण्याची शक्यता नाकारता येत नाही .

जकात वसुली करणेकामी जकात अभिकर्त्याची नेमणुक होणे आवश्यक असुन अ.नगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे दृष्टीने आर्थीकदृष्ट्या लाभाचे आहे. कारण खाजगी तत्वावर असलेल्या यंत्रणा म्हणजे कर्मचारी यांचे वेतन , वाहने व इतर तदनुषंगीक खर्च , संगणीकीकरण, दुरध्वनी, भ्रमणध्वनी यंत्रणा या बाबींची प्रशासनाकडुन पुर्तता होऊ शकणार नाही तसेच शहरात असणा-या जकात चोरीचा मागील अनुभव पाहाता पुर्णपणे बिमोड प्रशासनाकडुन होऊ शकत नाही.तसेच या कामात वारंवार होणारे हस्तक्षेप व अडथळे यांना पायबंध घालता येणार नाही.त्यामुळे महानगरपालिके मार्फत जकात वसुलीचे काम केल्यास ठेकेदाराकडुन मिळणा-या अपेक्षीत उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही जकात वसुली ठेका पध्दतीने दिल्यास अपेक्षीत उत्पन्नापेक्षा अधिक रक्कम मिळु शकते हे मागील कालावधी मध्ये दिलेल्या ठेक्यावरुन सिध्द होते.महानगरपालिकेकडील नाका कर्मचारी सध्या इतर विभागांत वापरण्यांत येऊन नागरीकांना सुविधा देणे , घरपट्टी वसुली इतर सोयीस्कर कामे त्यांना देऊन त्यांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यांत येत आहेत.महानगरपालिकेमार्फत जकात कराची वसुली करावयाची झाल्यास जकात नाक्यासाठी लागणारे महानगरपालिकेचे कर्मचारी सुमारे २५० ते ३०० लागणार आहेत.

मा.शासनाचे नगरविकास विभाग यांच्या कडील दि.३ मार्च१९९५ चे आदेशानुसार जकात अभिकर्ता नेमण्याच्या कार्यपध्दतीबाबत जे निर्देश दिलेले आहेत त्यातील निर्देश क्र.१७ नुसार जकात अभिकर्ता नेमणुकी कामीचे प्रक्रियेमध्ये विलंब झाल्यास अशा परिस्थीती मध्ये महानगरपालिकेस जकात अभिकर्त्यास एक महीना मुदतवाढ देता येईल अशाबाबत निर्देशीत करण्यात आलेले आहे.

सन २०१०-११ या वर्षाकरीता जकात वसुलीस्तव जकात अभिकर्ता नेमणुकी बाबत योग्य तो धोरणात्मक निर्णय घेण्याविषयी प्रस्तुत विषय हा मा. स्थायी समिती पुढे ठेवणे उचीत वाटते ,तरी उक्त बाबत पुढील योग्य त्या आदेशार्थ कार्यालयीन रिपोर्ट सविनय सादर.

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे.

मुख्य लेखा परिक्षक / अंतर्गत लेखा परिक्षक :- सदरचा विषय स्थायी समिती समोर चर्चेसाठी ठेवणेत यावा. दि. २०/७/२०१०

मा.उपायुक्त(कर)साहेब :-प्रस्तावीतनुसार मा.स्थायीसमिती समोर निर्णयार्थ सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर. दि.२०/७/२०१०

मा.आयुक्त साहेब :- मा.स्था.स.पुढे पाठवा मात्र Legal Opinion घेवुनच **"अ"** बाबत कार्यवाही प्रस्तावीत करावी. दि.२२/७/२०१०

विधीसल्लागार ॲड.श्री.तुळशीराम बाबर :- सविनय सादर, सदरील मा. हायकोर्टाचे जजमेंटचा विचार करता जकात व टोल या दोन्ही गोष्टी वेगळया आहेत. ज्याला जकात वसुलीचा अनुभव आहे. त्यांचा विचार करणे कायदेशीररित्या उचित होईल. दि.२७/०७/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- जकात अभिकर्ता नेमणेकामी दोन वेळेस जाहिर निविदा मागविल्या असता एकही निविदा प्राप्त न झाल्याने जकात वसुली कामी धोरणात्मक निर्णय घेणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- पथकर व जकात वसुली वेगवेगळी आहे का ?

मा.श्री.पवार बा.रे. :- टोल वसुल करणारास जकात वसुलीचा ठेका देता येईल का ?

म.न.पा. विधीसल्लागार ॲड.श्री. तुळशीराम बाबर :- मा. उच्च न्यायालय ,मुंबई येथे रिट पिटीशन नं. २५८४ / २००८ व १३५/२००९ या रिट पिटीशन मध्ये त्यावेळचे मुख्य न्यायमुर्ती मा. स्वतंत्र कुमार व न्यायमुर्ती मा.डॉ.डी.वाय. चंद्रचुड यांनी त्यांच्या पुढील वरील रिट पिटीशन मध्ये पथकर वसुली व जकात वसुली याबाबत स्पष्ट आदेश दिलेले आहेत , त्याच प्रमाणे जकात अभिकर्ता म्हणुन जकात वसुलीचे काम करणे हे विशेष प्रकारचे काम असुन त्याकामासाठी टोल वसुलीचा अनुभव हा जकात वसुलीचा अनुभव आहे असे समजण्यात येणार नाही असे स्पष्ट आदेश सदर निर्णयाच्या पेरा नं. १६ मध्ये दिलेले असुन त्यानुसार पथकर व जकात वसुली वेगवेगळया प्रकारची असून पथकर वसुल करणारे संस्थेस जकात वसुली करणेसाठी नेमता येणार नाही.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- सदरचे जकात अभिकर्त्यास एक महिन्याची मुदतवाढ देता येईल का ?

म.न.पा. विधी सल्लागार ॲड.श्री.तुळशीराम बाबर :- मा.शासनाचे नगर विकास विभाग यांच्या कडील दिनांक ३मार्च १९९५चे आदेशामधील निर्देश क्रमांक १७ नुसार अभिकर्ता नेमणुकी कामीचे प्रक्रिये मध्ये विलंब झाल्यास महानगरपालिकेस जकात अभिकर्त्यास एक महिना मुदतवाढ देता येईल. अशाबाबतचे मा. शासनाचे निर्देशानुसार एक महिन्याकरिता मुदतवाढ देता येईल.

मा.सौ. शिंदे शि.अ. , मा. सौ. ढवण शा. दि. **व** मा.सौ. ढोणे मा.सु. :- मा.सभापती , महोदय अ.नगर महापालिकेने सन२०१०-११ करिता जकात वसुलीसाठी जकात अभिकर्ता नेमण्यास दि.२३/६/२०१०अन्वये देकार रक्कम रू.५८,०५,०९,४९४/- निश्चित केलेली आहे. याप्रमाणे एक महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी. जुन्या देकारा प्रमाणे मुदतवाढ देण्यांत येवु नये ते नैसर्गिक न्याय पध्दतीने होणार नाही. त्यामध्ये अ.नगर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे. तरी याच अभिकर्त्याला नवीन देयकाप्रमाणे मुदतवाढ देण्यांत यावी.

मा.सौ.ढोणे मा.सु. :- मा.सभापती महोदय, जकात अभिकर्ता नेमणेचे विषयाबाबत पुढील प्रश्नांचा निर्णय व्हावा व सदर बाब प्रोसीडींगला घेण्यांत यावी ही विनंती., **मुद्दा क्र.१-** जाहिर निविदा सुचनेनुसार मे.एम.इ.पी. टोल रोड, प्रा.लि. यांनी दि.०५/०७/२०१० रोजी इसार रक्कम २,९०,२५,४७५/- भरणा केली व लगेचच दुस-या दिवशी म्हणजे दि.०६/०७/२०१० रोजी परताव्यासाठी अर्ज सादर केला आहे. म्हणजेच यात काही तरी गोम अथव गौंड बंगाळ आहे काय ? फक्त इसार रक्कम भरावयाची नंतर ठेकेदारांनी रिंग करावयाची आणि माघार घ्यावयाची यात ठेकेदारावर काही कार्यवाही करता येणार नाही. काय नियमाप्रमाणे इसार रक्कम केव्हा परत केली जाते ? ठेकेदारांना इसार रक्कम परत केली आहे काय ? माझे मते निवेदेची प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय सदरची रक्कम परत करता येत नाही. ठेकेदाराचे टेंडर रिजेक्ट झाल्याचे कळविले नंतरच रक्कम परत करता येते अशी माझी धारणा आहे. **मुद्दा क्र.२-** त्याचप्रमाणे दुस-या सूचनेनुसार दोन्ही ठेकेदाराने इसारा रक्कम भरणा केली मात्र निविदा भरली नाही याबाबतही रिंग झालेली असेल त्यामुळे महापालिकेचे नुकसान झालेले आहे. त्यास जबाबदार कोण आहे ? ठेकेदारावर काळया यादीमध्ये टाकावयाची कार्यवाही करता येणार नाही काय ? **मुद्दा क्र.३-** महापालिकेचे सभागृह नेत्यांना प्रशासकीय कार्यवाही मध्ये हस्तक्षेप करता येतो काय ? विषय क्र.२७ दि.२३/०६/२०१० रोजी झालेल्या स्थायी समितीमधील चर्चेमध्ये अट क्र.- १ ते ११ मध्ये पथकर [टोल] वसुलीचा अनुभव असावा अशा प्रकारचा उल्लेख नाही परंतु ठरावमध्ये जकात / पथकर [टोल] वसुलीचा अनुभव असावा अशी शब्द रचना कोणत्या स्थायी समिती सदस्याने केली याचा बोध होत नाही. याचाच अर्थ स्थायी समितीने ठरविलेल्या विषयात बदल होत आहे. याबाबत बदल करणा-या अधिका-यावार योग्य ती कार्यवाही होणार काय? **मुद्दा क्र.४-** इतर महापालिकेकडून माहिती घेण्यात आल्याचे समजते तरी सदर महापालिकेचा माहितीचा अहवाल समितीसमोर मांडण्यात यावा.**मुद्दा क्र.५-** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन आदेश क्र.जी. इ.एन. १०९४ /प्र.क्र. १४३/नवि मंत्रालय मुंबई दि.३ मार्च १९९५ अन्वये निवडणुकीमुळे आणि आचारसंहिता असल्यामुळेच सन १९९५-९६ मध्ये जर महापालिका निविदाची प्रक्रिया पूर्ण करू शकत नसतील तरच एक महिन्याची मुदतवाढ देता येईल. असे असतांना स्थायी समितीला मुदतवाढ देता येईल काय ? **मुद्दा क्र.६**- मागील आर्थिक वर्षामध्ये मंदीच्या लाटेच्या प्रशासनाच्या चुकीच्या धोरणामुळे १०कोटी रूपये कमी प्राप्ती झाली आहे आता समजा एक महिन्याची मुदत वाढ दयावयाची झाल्यास चालू आर्थिक वर्षाच्या देयेकावर रक्कम रूपये ५८,०५,९०००/- सरासरी एक महिन्याची करावी लागणार नाही काय? रूपये ४,००,५०,०००/- ऐवजी ४,८३,७५,८००/- रूपये एवढी जकात नविन आर्थिक वर्षाची एका महिन्याची होत आहे.तरी कोणती रक्कम मान्य करावयाची याबाबत खुलास व्हावा. **मुद्दा क्र.७-** टेंडर प्रक्रिया ऑन लाईन करणेत आली किंवा कसे ?

मा.सभापती साहेब :- मा.सौ. ढोणे मॅडम आपले पत्रामधील मुद्दा क्रमांक १ हा आपले अखत्यारीतील नाही. मुद्दा क्रमांक दोन बाबत कार्यवाही चालु असुन मुद्दा क्रमांक तीन टोल वसुलीचा अनुभव असावा अशी अट आपण स्थायी समितीने टाकलेली असुन मा. सभेचे इतिवृत्त मा.सभेने कायम केलेले आहे. मुद्दा क्रमांक चार इतर महानगरपालिकाकडून माहिती घेतलेला नाही मुद्दा क्रमांक पाच मा. शासन निर्देशनुसार एक महिन्याची मुदतवाढ देता येईल. मुद्दा क्रमांक सहा पूर्वीचेच दराने मुदतवाढ देणे असुन मुदतवाढ देण्यांचे अधिकार मा.स्थायी समितीस आहे. मुद्दा क्रमांक सात टेंडर प्रक्रिया ऑनलाईन केलेली नाही. याप्रमाणे आपले पत्राचे उत्तर मी देत आहे. सध्याचे अभिकर्ता संस्थेस एक महिन्याची मुदतवाढ देणे झाल्यास मागील वर्षीचे मंजूर दरानुसार येणारी रक्कम किती आहे हे सांगावे

जकात विभाग वरिष्ठ लिपीक श्री.जे.एल. सारसर :- मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मुंबई यांना दिनांक ०१/०८/२००९ ते ३१/०७/२०१० या कालावधी करिता दिनांक ३०/०७/२००९ रोजी करण्यांत आलेल्या करारनाम्यातील अटी / शर्तीच्या अधिन प्रशासकीय इमारतीचे बांधकामासाठीच्या रक्कम रूपये १ कोटी ४० लाखाचे रकमेसह ऑगस्ट २०१० या १ महिन्याचे कालावधीकरिता रूपये ४,१२,१६,६६६/- एवढी रक्कम येते ती समान चार हप्ता मध्ये महानगरपालिकेकडे ठेकेदारास भरावी लागेल.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- या रकमेमध्येच ठेका देता येईल का ? सदरचे अभिकर्त्यास १० %वाढ करून जकात वसुली कामी मुदतवाढ देण्यांत यावी. महानगरपालिका कर्मचा-यामार्फत जकात वसुली केल्यास काय होईल.

जकात विभाग वरिष्ठ लिपीक श्री.जे.एल. सारसर :- मागील वर्षाचे जकात वसुलीकरिता नेमलेले अभिकर्त्यास मुदतवाढ द्यावयाची झाल्यास त्यांना पूर्वीचेच दराने मुदतवाढ द्यावी लागेल. महानगरपालिका कर्मचा-या मार्फत जकात वसुली करावयाची झाल्यास महानगरपालिकेचे इतर विभागाकडील कर्मचारी जकात वसुली कामी वर्ग करावे लागतील. मागील जकात वसुलीचा अनुभव पहाता महानगरपालिका कर्मचा-यामार्फत जकात वसुली केल्यास ती कमी होईल. जास्त होणार नाही. निवडणुकीचे कामासाठी वसुली कर्मचा-यांची नेमणूक केलेली असल्याने जकात वसुली साठी कर्मचारी देणे जिकीरीचे आहे.

मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब :- जकात वसुलीसाठी एक महिन्यासाठीच मुदतवाढ देणे शक्य आहे जकात वसुली महानगरपालिका कर्मचा-यामार्फत करावयाची किंवा ठेकेदारास पूर्वीचेच दराने जकात वसुलीकरिता १ महिन्याचे कालावधीसाठी मुदतवाढ द्यावयाची हे मा.सभेने ठरवावे.

मा.श्री. पवार बा.रे. :- वसुली विभाग व इतर विभागातील कर्मचा-यांची जकात वसुली कामी नेमणूक केल्यास ऑफिसची कामे ही वेळचे वेळी होणार नाहीत. जकातही कमी वसुल होईल.ऑफिस कामात अडचणी निर्माण होतील. सध्याचे जकात अभिकर्तासच जकात वसुलीसाठी एक महिन्याची मुदतवाढ पूर्वीचेच दराने देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- सदर ठेकेदाराने मुद्राक शुल्क भरलेले नाही म्हणून त्यांना नोटीस आलेली आहे. त्यांचे डिपॉझिटची रक्कम रिफंड करू नये.

जकात विभाग वरिष्ठ लिपीक श्री.जे.एल. सारसर :- त्यांची बँक सिक्युरिटी डिपॉझीट आपणाकडेस आहे. अभिकर्त्यास त्याबाबत पत्र दिलेले असून महानगरपालिकेकडील बँक गॅरंटी सिक्युरिटी डिपॉझीट त्यांना रिफंड केले जाणार नाही.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- सन २००९-२०१० सालाकरिता अभिकर्ता नेमणूकी साठी जाहिर निविदा तात्काळ करण्यांत यावी. १०दिवसामध्ये सदर बाबत कार्यवाही पूर्ण व्हावयास हवी तसेच त्या पुढील वर्षाकरिता आभिकर्ता नेमणूकीसाठी करार संपण्यांचे ३ महिने अगोदर जाहिर निविदा मगाविण्यांची कार्यवाही करण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- जकात वसुलीकामी सध्याचे अभिकर्त्यास १ महिन्याची मुदतवाढ पूर्वीचेच करारातील अटी/ शर्ती दरानुसार देण्यांस मंजूरी देण्यांत यावी. पुढील जकात निविदा प्रक्रिया तात्काळ सुरू करण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेने दिनांक ०१/०८/२००९ ते दिनांक ३१/०७/२०१० या कालावधीसाठी मंजूर केलेल्या एकूण देकार रक्कम व प्रशासकीय इमारतीचे बांधकामासाठी चे रकमेसहचे जकात वसुली दराचे प्रमाणात १ महिन्याकरिता येणारी रक्कम रूपये ४,१२,१६,६६६/- निश्चित करून मे. सहकार एजन्सी प्रा.लि. मुंबई यांना दिनांक ०१/०८/२०१० ते दिनांक ३१/०८/२०१० या १ महिन्याचे कालावधीसाठी मागील अटी / शर्ती नुसार जकात वसुली करिता १ महिन्याची मुदतवाढ देण्यांस बहुमताने मंजूरी देण्यांत यावी. महानगरपालिकेने जकात अभिकर्ता नेमणूकी साठी प्रसिध्द केलेल्या निविदा अटी / शर्ती मधील "निविदाकारास टोल वसुलीचा अनुभव असावा" ही अट रद्द करून फक्त जकात वसुलीचा अनुभव असणारे निविदा कारास जकात वसुली करिता नेमण्यात यावे. तसेच जकात वसुली कामी अभिकर्ता नेमणूकीसाठी पुढील निविदा प्रक्रिया तात्काळ सुरू करण्यांस बहुमताने मंजूरी देण्यांत यावी. सदर सभेचे इतिवृत्त कायम होण्यांची वाट न पहाता सदर बाबत तात्काळ कार्यवाही करण्यांत यावी

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या मालावर जकात वसुली कामी सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षातील बारा महिन्याकरिता जकात अभिकर्ता नेमणे कामी दुस-यांदा जाहिर निविदा प्रसिध्द करूनही एकही निविदा प्राप्त झालेली नसल्याने योग्य तो धोरणात्मक निर्णय ठरविणे बाबत. सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या जकात संकलन अभिककर्ता मे.सहकार एजन्सी प्रा.लि.मुंबई यांना दिनांक०१/०८/२००९ ते ३१/०७/२०१० या कालावधीसाठी मंजूर केलेली एकूण देकार रक्कम व प्रशासकीय इमारतीचे बांधकामासाठीचे रक्कमेसहचे जकात वसुली दराचे प्रमाणात १महिन्याकरिता येणारी रक्कम रूपये ४,१२,१६,६६६/- (रूपये चार कोटी बारा लाख सोळा हजार सहाशे सहासष्ट फक्त) एवढी रक्कम निश्चित करून मे. सहकार एजन्सी प्रा.लि. मुंबई यांना दिनांक ०१/०८/२०१० ते ३१/०८/२०१० या १ महिन्याचे कालावधीसाठी मागील अटी / शर्तीनुसार जकात वसुली करिता १ महिन्याची मुदतवाढ देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

महानगरपालिकेने जकात अभिकर्ता नेमणूकी साठी प्रसिध्द केलेल्या निविदा अटी / शर्ती मधील "निविदाकारास टोल वसुलीचा अनुभव असावा" ही अट रद्द करून फक्त जकात वसुलीचा अनुभव असणारे निविदा कारास जकात वसुली करिता नेमण्यात यावे. तसेच जकात वसुली कामी अभिकर्ता नेमणूकीसाठी पुढील निविदा प्रक्रिया तात्काळ करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.तथापी सदर सभेचे इतिवृत्त कायम होण्यांची वाट न पहाता सदर कामी तात्काळ कार्यवाही करण्यांत यावी

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.